**CNR NO. MHSN090013342019**

# दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, तासगांव, जि. सांगली

(पीठासिन अधिकरी श्री. किरण रा. खोंद्रे)

**नियमित दिवाणी दावा क्रमांक १६२/२०१९.**
**निशाणी क्रमांक ०५ खालील एकतर्फा अंतरिम आदेश**

| | | |
|---|---|---|
| ०१. | श्री. वर्धमान बाळासाो कोंगनोळे. | **वादी** |
| | *विरुध्द* | |
| ०१. | श्रीमती प्रभावती पायगोंडा पाटील वगैरे ५. | **प्रतिवादी** |

**(०१).** प्रस्तुत अर्ज व त्यासोबत दाखल असलेले शपथपत्र, दावा व दाव्यासोबत दाखल असलेली कागदपत्रे पाहिली. वादीचे विद्वान वकील श्री. एस. एस. आडसूळ यांचा युक्तीवाद ऐकला. वादीचा दावा असा आहे की, वाद मिळकत म्हणजेच गटक्रमांक ६८१ पैकी ८ आणे हिस्सा हा प्रस्तुत वादीस मृत्यपत्रान्वये मिळालेला आहे. प्रस्तुत वादी व प्रतिवादी यांच्या दरम्यान याच न्यायालयात यापूर्वी नियमित दिवाणी दावा क्रमांक ९७/२००९ हा दाखल होता, की ज्यामध्ये प्रस्तुत वादी हे प्रतिवादी क्रमांक ०४ म्हणून सामील होते. या दाव्यामधील वादी यांने निशाणी क्रमांक ३५ येथे दिलेला अंतरिम मनाईचा अर्ज तात्कालीन न्यायाधीशांनी मंजूर केलेला होता व त्या दाव्यातील वादीने म्हणजेच या दाव्यातील प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०३ यांनी वादीचा वाद मिळकतीतील कब्जेवहिवाटीस दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत हरकत, अडथळा करुनये असा आदेश केला होता. वादीचे पुढे असे कथन आहे की, त्या दाव्यामध्ये प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०३ यांनी निशाणी क्रमांक ४७ येथे अर्ज दाखल करुन दावा नव्यांने दाखल करण्याच्या परवानगीसह दावा काढून घेण्याची विनंती केली होती व ती विनंती तात्कालीन न्यायाधीशांनी रक्कम रुपये २,०००/- द्रव्यदंड करुन दिनांक

३०.११.२०१९ रोजी दावा काढून घेण्यास परवानगी दिली होती. असे असतांना यातील प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०३ यांनी न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे द्रव्यदंड रक्कम जमा करुन त्यांच्या मुळ दाव्यातील तांत्रीक दोष दुर करुन नव्याने दावा दाखल न करता या वादीचे विरुध्द कॅव्हीएट अर्ज क्रमांक ३३/२०१९ दिनांक ०२.१२.२०१९ रोजी दाखल केले आहे. नियमित दिवाणी दावा क्रमांक ९७/२००९ मध्ये या वादीचे बाजूने झालेला मनाईचा आदेश दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत अस्तित्वात होता व या बाबीस व पर्यायाने त्या आदेशास बगल देण्याच्या हेतुने नियमित दिवाणी दावा क्रमांक ९७/२००९ मधील वादीने, तो दिनांक ३०.११.२०१९ रोजी काढून घेतला व लगेचच दोन दिवसांनी या वादीचे विरुध्द वर नमुद कॅव्हीएट अर्ज दाखल केला आहे. वादीचे पुढे असे कथन आहे की, मनाईचा आदेश केवळ दाव्याचा निकाल लागेपर्यंत होता आता तुमचा मिळकतीशी काहीही सबंध नाही असे म्हणून प्रतिवादी हे वादीचे दावा मिळकतीतील ८ आणे हिश्यातील कब्जेवहिवाटीस की जी कब्जेवहिवाट तात्कालीन न्यायाधीशांनी नियमित दिवाणी दावा क्रमांक ९७/२००९ मध्ये निशाणी क्रमांक ३५ वरील आदेशाने मान्य केलेली होती त्यास हरकत, अडथळा करत आहेत.

**(०२).** वादीने दाखल केलेला नियमित दिवाणी दावा क्रमांक ९७/२००९ ची निशाणी क्रमांक ०१ व त्याखालील पारित झालेला आदेश तसेच सदर दाव्यातील निशाणी क्रमांक ३५ वरील अर्ज व त्यावरील आदेश पाहिले असता असे दिसून येते की, तात्कालीन न्यायाधीशांनी प्रस्तुत वादी म्हणजेच नियमित दिवाणी दावा क्रमांक ९७/२००९ मधील प्रतिवादी क्रमांक ०४ यांचे दावा मिळकतीतील ८ आणे हिश्यातील कब्जेवहिवाट मान्य केली होती व त्या दाव्यातील वादीनेच

प्रतिवादी क्रमांक ०४ चे कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करुनये असा आदेश करण्यात आला होता. उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, त्यातील प्रतिवादी यांनी मुळ दाव्यातील वादी क्रमांक ०३ यांना पुढे करुन कॅव्हीएट अर्ज क्रमांक ३३/२०१९ दाखल केलेला आहे. तसेच नियमित दिवाणी दावा क्रमांक ९७/२००९ हा दावा दिनांक ३०.११.२०१९ रोजी काढून घेतल्यानंतर लगेचच दोन दिवसांनी दावा दाखल न करता कॅव्हीएट अर्ज दाखल केला आहे. यावरुन देखील वादी कथन करतात त्याप्रमाणे प्रतिवादीनी नियमित दिवाणी दावा क्रमांक ९७/२००९ मधील प्रस्तुत वादीचे लाभात पारीत झालेला मनाई आदेशास बगल देण्याच्या हेतुने मुळ दावा काढून घेतला आहे व ते आता वादीच्या दावा मिळकतीमधील ८ आणे क्षेत्राच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करत आहेत हे सकृतदर्शनी खरे आहे असे वाटते. वादीच्या कथनानुसार मिळकतीमधील त्यांचा ८ आणे क्षेत्रात सध्या कापणीसाठी तयार असलेले ऊस पिक उभे असून प्रतिवादींना दाव्याच्या नोटीसा लागू होईपर्यंत अंतरिम मनाई आदेश दिला नाहीतर वादीचे पैशात न भरुन येणारे असे नुकसान होणार आहे. कबूल तथ्यानुसार या वाद मिळकतीच्या अनुषंगाने वर नमुद केल्याप्रमाणे कॅव्हीएट अर्ज दाखल आहे असे असलेतरी नामदार आंध्रप्रदेश उच्च न्यायालय ने **Reserve Bank Of India Employees vs The Reserve Bank Of India And Ors. AIR 1981 AP 246** या न्यानिर्णयामध्ये परिच्छेद क्रमांक ०५ मध्ये असे आदेशीत केले आहे की, "Mere lodgement of a caveat would not deprive the Court of its power to pass an order even if the caveator was not informed of the dale of hearing of the matter. As the lodgement of a caveat is merely a right to be informed of the hearing date and it has no effect by way of curtailing the powers of a Civil Court to pass an appropriate order on the merits of the case". या

सर्व तथ्यांचा विचार करता आणि सकृतदर्शनी प्रतिवादी यांनी नियमित दिवाणी दावा क्रमांक ९७/२००९ हा शुध्द हेतुने मागे घेतला नसून केवळ वादीच्या लाभात असलेला मनाई आदेश गैरलागू होईल याकरिता काढून घेवून, वादीच्या विरुध्द कॅव्हीएट अर्ज दाखल करुन वादीच्या कब्जेवहिवाटीस हरकत करत असल्यांचे सकृतदर्शनी दिसत असल्यांने मी वर नमुद नामदार आंध्रप्रदेश उच्चन्यायालयाच्या आदेशास अनुसरुन खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## **आदेश**

**०१.** प्रतिवादी यांना आदेशीत करणेत येते की, ते प्रस्तुत दाव्याचे कामी हजर होवून म्हणणे दाखल करत नाहीत, तोपर्यंत दावा मिळकतीच्या ८ आणे क्षेत्रावर वादीच्या असलेल्या कब्जेवहिवाटीस हरकत, अडथळा करुनये.

**०२.** प्रतिवादी यांना नोटीस देण्यात येते की, त्यांनी प्रस्तुत आदेश कायम करण्यात का येऊनये याबाबतचे म्हणणे दाखल करावे.

**०३.** वादींना आदेशित करण्यात येते की, त्यांनी दिवाणी प्रक्रिंया संहिता आदेश ३९, नियम ३(अ) प्रमाणे पूर्तता करुन त्याबाबतचे शपथपत्र दाखल करावे.

**०४.** तत्काळ प्रोसेस व विशेष बेलीफ मंजूर करण्यात येतो.

Kiran Rajaram Khondre
Digitally signed by Kiran Rajaram Khondre
Date: 2019.12.13 17:41:27 +0530

**तासगांव.** (किरण रा. खोंद्रे)
दिनांक : १३ डिसेंबर २०१९. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, **तासगांव**.

मी हमी देतो की, सदरच्या पी.डी.एफ. फाईल मधील सर्व मजकूर हा मुळ आदेशातील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – श्री. रुपेश शिवाजी पोळ.

न्यायालय – दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, तासगांव,
जिल्हा सांगली.

दिनांक – १३ डिसेंबर २०१९.

न्यायीक अधिकारी यांनी
सही केलेली दिनांक – १३ डिसेंबर २०१९.

आदेश अपलोड दिनांक – १४ डिसेंबर २०१९.